# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक 2007/(322/07) विशि-4 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 (1994 चा महा. 35) च्या कलम 3 च्या पोटकलम (2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर, 2011 रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, 2016 (सन 2017 चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक 6) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (आस्थापना विभाग)

एम. आय. डी. सी. रोड कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली 442605
दुरध्वनी क्रमांक :- 07132-223104 E-mail :- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गों.वि./आस्था./3734 /2025 दिनांक:-29 /11/2025

## *परिपत्रक*

***विषय:- दिनांक 01-12-2025 व दिनांक 02-12-2025 रोजी सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्याबाबत.***
*संदर्भ:- मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे पत्र दिनांक 27-11-2025*

विद्यापीठाशी संलग्नित चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे संदर्भांकित पत्रान्वये चंद्रपुर जिल्ह्यातील **बल्लारपुर, भद्रावती, वरोरा, ब्रम्हपुरी, मुल, घुग्गुस, गडचांदूर, चिमूर, राजूरा, नागभिड** या नगरपरिषदांमधील व **भिसी** नगरपंचायतीमधील सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक 02-12-2025 रोजी मतदान होणार असल्याने चंद्रपुर जिल्ह्यातील उपरोक्त हद्दीतील महाविद्यालयांना दिनांक 01-12-2025 व दिनांक 02-12-2025 रोजी सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्याचे निर्देश प्राप्त आहेत.

त्याअनुषंगाने उक्त निर्देशाचे अधिन राहून **चंद्रपुर जिल्ह्यातील उपरोक्त हद्दीतील महाविद्यालयांना** दिनांक 01-12-2025 व दिनांक 02-12-2025 रोजी सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्यात येत आहे. कृपया नोंद घ्यावी.

**संलग्न:-** मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे पत्र दिनांक 27-11-2025

(डॉ. अनिल हिरेखण)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**प्रत माहितीकरीता सविनय सादर:-**

1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
2) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
3) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
4) मा. अधिष्ठाता(सर्व), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
5) मा. संचालक(सर्व), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
6) मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
7) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये चंद्रपुर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
8) मा. शिक्षक-शिक्षकेत्तर विभाग प्रमुख(सर्व) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
9) सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.
10) जनसपंर्क अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना उचीत कार्यवाहीस्तव.

*buradepravin* E:\Latters\Circular\213

महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर,यांचे कार्यालय

E-mail :- dpochandrapur@gmail.com(नगर परिषद प्रशासन) Ph.No. 07172-271180

क्रमांक/कार्या-10/नविशा/ कार्यासन-01/2025/562 दिनांक :-27/11/2025

संदर्भ :- 1) मा. उप सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.रानिआ/मनपा 2008/ प्र.क्र.09 / का-5, दिनांक 11/11/2008

2) मा .सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस 2025/ प्र.क्र.42/ का-7, दिनांक 04/11/2025.

**//आदेश//**

ज्याअर्थी, मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी संदर्भ क्र. 2 अन्वये **चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर, भद्रावती, वरोरा, ब्रम्हपुरी, मुल, घुग्घुस, गडचांदूर, चिमूर, राजुरा, नागभीड या नगरपरिषदांमधील व भिसी नगरपंचायतीमधील** सदस्य व अध्यक्ष पदांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. सदर निवडणूक कार्यक्रमानुसार उपरोक्त नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रामध्ये अध्यक्ष व सदस्य पदाकरिता मंगळवार दिनांक 02/12/2025 रोजी मतदान होणार आहे.

आणि ज्याअर्थी, संदर्भीय आदेश क्र. 1 नुसार मा. राज्य निवडणूक आयोग यांनी ज्या दिवशी मतदान अधिकारी/कर्मचारी सर्व मतदान साहित्य घेऊन मतदान केंद्राचा ताबा घेतात त्यादिवशी व मतदानाच्या दिवशी सुद्धा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीतील शाळांना यांना सुट्टी असणे आवश्यक आहे, असे नमूद केलेले आहे.

त्याअर्थी, चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर, भद्रावती, वरोरा, ब्रम्हपुरी, मुल, घुग्घुस, गडचांदूर, चिमूर, राजुरा, नागभीड या नगरपरिषदांमधील व भिसी नगरपंचायतीमधील सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मंगळवार दिनांक 02/12/2025 रोजी मतदान होणार असल्याने तसेच सदर निवडणुकांसाठी मतदान केंद्रावर नियुक्त केलेल्या मतदान अधिकारी/कर्मचारी यांना मतदान साहित्य घेऊन जाण्याकरिता **दिनांक 01/12/2025 (सोमवार) व दिनांक 02/12/2025 (मंगळवार) ला दोन दिवस चंद्रपूर जिल्ह्यातील उपरोक्त नगरपरिषद/नगरपंचायतीच्या हद्दीतील शाळा/महाविद्यालय यांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करीत आहे.**

(विनय गौडा जी सी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा दंडाधिकारी, चंद्रपूर**

**प्रत:-**

1) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय ईमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई 400032, यांना माहीतीस्तव सविनय सादर.
2) मा. प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहीतीस्तव सविनय सादर.
3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना माहीतीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. सदर दिवशी मतदान केंद्र खुली राहतील तसेच केंद्रात पिण्याचे पाणी, विज व्यवस्था विजेची उपकरणे इ. सुस्थितीत असल्याची खात्री करण्याबाबत संबंधितांस आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.
4) जिल्हा पोलिस अधिक्षक, चंद्रपूर यांना माहीतीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
5) कुल सचिव, गोंडवाना विद्यापीठ, एम आय डी सी रोड, गडचिरोली यांना माहितीस व तात्काळ आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
6) निवडणूक निर्णय अधिकारी, नगरपरिषद/पंचायत बल्लारपूर/भद्रावती/वरोरा/ब्रम्हपुरी/मुल/ घुग्घुस/ गडचांदूर /चिमूर/राजुरा/नागभीड/भिसी यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
7) मुख्याधिकारी, नगरपरिषद/पंचायत बल्लारपूर/भद्रावती/वरोरा/ब्रम्हपुरी/मुल/ घुग्घुस/गडचांदूर/चिमूर/राजुरा/ नागभीड/भिसी यांना माहितीस व तात्काळ कार्यवाहीस अग्रेषित.
8) शिक्षणाधिकारी, (प्राथमिक /माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना माहितीस व तात्काळ आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली